# या भुतांनो या!

दोन अंकी नाटक


## ले. प्रल्हाद जाधव


पात्र संयोजन :

१. श्री. ढवळीकर (५०)

२. सौ. ढवळीकर (४५)

३. झिपरी हडळ (४५)

४. भस्म्या बाबा (४०)

५. बंड्या (२५)

६. डॉली (२५)

अंक पहिला / प्रवेश पहिला

स्थळ : गावाबाहेरच्या एका छोट्या टेकडीवरील स्मशान. टेकडीच्या पायथ्याशी प्रवेशद्वार. मागच्या बाजूनं नदी वाहत आहे. आत आलं की एकीकडे लाकडाची वखार. दुसरीकडे अंत्यसंस्काराचे चौथरे.  लोकांना बसण्यासाठी, प्रार्थनेसाठी मोकळी जागा. अर्थात् यापैकी काहीही रंगमंचावर दिसत नाही.

रंगमंचावर फक्त काही उभे-आडवे चौथरे. या दफन केलेल्या माणसांच्या समाध्या. समाध्यांचे दगड ढासळलेले. अधून मधून गवत वाढलेले. मधोमध पुढच्या बाजूला एक बऱ्या अवस्थेतील समाधी. पाच बाय तीन फुट आकाराची. बरंचसं नाटक या समाधीवर आणि तिच्या आसपास घडणार आहे. त्या समाधीपर्यंत पोहोचण्यासाठी एक पायवाट. पायवाट म्हणजे गवत आणि झुडुपांच्या गर्दीत लुप्त झालेला एक चिंचोळा भूभाग. या भागाचा वापर पुढे वेगवेगळ्या प्रसंगांसाठी करता येतो.

मुख्य समाधीच्या बाजूला डावीकडं आणि उजवीकडं लहानमोठ्या चार- पाच समाध्या. त्यांना १, २, ३, ४,५ असे क्रमांक दिले आहेत.  एका चौथऱ्यावर शेंदरानं माखलेले चार-पाच दगड. एक छोटी भगवी पताका. काही ताजी फुलं, गुलाल...

समाध्यांचा मागचा भाग पोकळ. त्यात नाटकाची प्रॉपर्टी ठेवता येते. ती अर्थात् प्रेक्षकांना दिसत नाही. पात्रं त्यांना हवं असलेलं साहित्य हवं तेव्हा तेथून काढून घेतात आणि परत ठेवतात. समाध्यांना खालून छोटी चाकं लावलेली. त्यामुळे गरजेनुसार त्या थोड्या हलवता येतात. डावीकडं म्हणजे प्रेक्षकांच्या उजवीकडं विंगेला लागून एक पडकी भिंत. ती म्हणजे स्मशानाची हद्द. डावीकडच्या विंगेतून आणि मागून ये-जा करता येते. जाण्या-येण्यासाठी ठरावीक दार वगैरे नाही. पडक्या भिंतीला लागूनच वडाचं एक मोठं झाड. अर्थातच एखादी फांदी रंगमंचांवर, बाकीचे झाड विगेत.

पडदा उघडताना पाकोळ्यांची फडफड. घुबडांचे घुत्कार वावटळीचा आवाज. गूढरम्य वातावरण निर्माण करणारं संगीत पडदा उघडतो.

(श्री. ढवळीकर विंगेतून ढकलल्यासारखे रंगमंचावर येतात. बायकोच्या कटकटींना कंटाळून त्यांनी घर सोडले आहे. विंगेच्या दिशेने पाहत बोलू लागतात–)

श्री : काय समजतेस काय तु स्वतःला? हजार वेळा बजावून सांगितलं होतं की माझा अंत बघू नको म्हणून! पण शेवटी माझ्यावर घर सोडण्याची वेळ आणलीस तू! झालं तुझ्या मनासारखं? आता बस बोंबलत आणि कर तुला हवं ते! कोणी येणार नाही विचारायला तुला... लाडाकोडात वाढलेला एक दिवटा चिरंजीव होता तो पंख फुटताच गेला हातावर तुरी देऊन आणि मुलगी होती सोन्यासारखी ती ही गेली लहानपणीच तापाचं निमित्त होऊन... आणि शेवटी मलाही बाहेर काढलंस; आता बस रामाचं राज्य करीत एकटीनं!

(वर पाहात) देवा परमेश्वरा, सोडवलंस रे बाबा एकदाचं. अनंत उपकार झाले तुझे. कसं अगदी मोकळं मोकळं वाटतंय... वा! खरं तर घर सोडून जाण्याची ही अक्कल आधीच आली असती तर किती बरं झालं असतं... पण जाऊ दे, म्हणतात ना, बेटर लेट दॅन नेव्हर!

बसावं जरा चार घटका कुठंतरी आणि जीव कसा द्यायचा याचा शांतपणं विचार करावा. बाकी एकदा मरायचं ठरल्यावर निर्णय घाईत घेतला काय नि शांतपणं घेतला काय, त्याला तसा काही अर्थ उरत नाही हेही खरंच!

समाधी दिसतंय कुणाचीतरी. बसावं जरा. वाटलंच तर ताणून देऊ तास दोन तास, नाहीतरी इथं या स्मशानात येणाराय कोण आपल्यावर ऑब्जेक्शन घ्यायला? चला, श्रीयुत ढवळीकर, सगळ्या पाशातून मुक्त झालात तुम्ही! ( समाधी रुमालाने झटकून स्वच्छ करत बसणार इतक्यात त्याचं लक्ष प्रेक्षकांकडं जातं.)

ओ हो, नमस्कार मंडळी! (वाकून नमस्कार करत) चला बरं झालं, तुमची भेट झाली. आता तुमच्यापासून काय लपवून ठेवायचं म्हणा! बायकोच्या कटकटींना कंटाळून बाहेर पडलाय. तुम्ही म्हणाल, बायको म्हटलं की कटकट आलीच, त्यासाठी घर सोडून जाण्याची काय गरज? बरोबर आहे तुमचं म्हणणं पण त्या कटकटींना काही सुमार? मी ॲडजेस्ट करण्याचा खूप प्रयत्न केला. पण तिनं इतकं ताणलं, इतकं तागलं की संपलंच सारं काही. काही झालं तरी परत घरी जायचं नाही आता. जिवंतपणी तर नाहीच नाही पण मेल्यावरसुद्धा नाही आणि म्हणून तर सरळ स्मशानात आलो. एखादा माणूस जर स्मशानात येऊन मेला तर त्याची बाडी पुन्हा घरी नेण्याची रीत नाही आपल्याकडं!

(सौ.चा आवाज येतो, “बरं झालं दुसरं लग्न करायला मी मोकळी झाले!”)

(विंगेत पाहात ) अगं, जा जा! दुसरं लग्न करायला 'फिगर' लागते तशी! तुझ्यासारख्या हडळीशी लग्न करायला आता कोण येणाराय पुढं? मी एक चूक केली ती केली पण इतरही करतील असं समजू नको तू!

नाक बघ जरा आरशात. बटाटावडा आहे नुस्ता ! आणि तोंडाचं वर्णन काय करावं तुझ्या? चोवीस तास सुरूच असतं ते! लोहाराचा भाता परवडला त्यापेक्षा! कडू कारलं तुपात तळलं, साखरेत घोळलं, तरी कडू ते कडूच!

तुझ्या या असल्या कटकट्या स्वभावामुळं बंड्या गेला घर सोडून! आता बोलव तुझ्या त्या साळकाया- म्हाळकायांना आणि बस फुगड्या घालत; नाहीतर हळदीकुंकू समारंभ साजरे करत! (पुन्हा प्रेक्षकांना)

मंडळी, हिनं जर लक्ष घातलं असतं आणि मदत केली असती तर आज कुठच्या कुठं गेला असता आमचा बिझनेस. आमच्या कंपनीचं नाव वाचलंच असेल तुम्ही कधीतरी. 'ढवळीकर यांचं वटवाघळाचं तेल'. उडत्या वटवाघळाचं चित्र असणारा आमच्या कंपनीचा लोगो तर नक्कीच बघितला असेल तुम्ही. सांधेदुखीवरचा रामबाण उपाय! आमच्या तेलाला कमी मागणी आहे असं समजू नका. लांब लांबचे लोक समक्ष येतात. पत्रं पाठवतात, मनीऑर्डी पाठवतात. अनेक पिढ्या जगल्या आमच्या या धंद्यावर... हिला म्हटलं जरा मॉडर्नायझेशन करू या धंद्याचं... जमाना बदललाय आता. पण हिला कुठलं पटायला? तिला फक्त पैसा पाहिजे मैत्रिणींवर उडवायला आणि थिएटरमध्ये जाऊन फालतू सिनेमे पाहायला! स्वतःचा मेकप आणि सोशलवर्कच्या नावाखाली चालणारे महिलामंडळाचे धिंगाणे यात मुलाचं आणि नवऱ्याचं जगणं मुष्कील करून टाकलं या बयेनं. शेवटी सोडलं घर. (आत पाहात) लक्षात ठेव, मी मेलो तरी चालेल पण तुला अद्दल घडवल्याशिवाय राहणार नाही!

(स्वतःशीच) अरे हो, आपल्याला तर खरोखरंच मरायचंय पण आपण नुसती बडबड काय करत बसलोय? जरा पडू थोडं या समाधीवर आणि मरायचं कसं याचा प्लॅन फायनल करून टाकू! (हात उशाखाली घेऊन समाधीवर पडत... हां, छान... आत्ता कसं!

सौ : (समाधीच्या मागच्या बाजूला सौ. ढवळीकर आधीच येऊन बसलेल्या. त्या वर उठत– ) आई गऽऽऽ  अंगं चेपलं माझं सगळं! जरा टेकावं म्हटलं तर इथंही कोण धटिंगण पडला हा माझ्या अंगावर! (वस्सकन अंगावर जात) कोण तुम्ही? (दोघेही एकमेकांकडे पाहतात. इथे भेंट होईल हे दोघांनाही अपेक्षित नसतं)

श्री : मला ओळखलं नाहीस? मी म्हसोबा. तू कोण?

सौ : मी हडळ.

श्री : मग बरोबर जोडी जमली आपली!

सौ : म्हसोबाला नव्हती बायको आणि हडळीला नव्हता नवरा! ( दोघंही भानावर येतात. तो तिच्या आणि ती त्याच्या मागं लागतं. समाधी भोवती पकडापकडी सुरू असल्याप्रमाणं...)

सौ : अगबाई तुम्ही होय? इथं काय करत होतात सांगा? कशाला कडमडलात इथं?

श्री : मी कुठं कडमडलोय? आणि तू कोण विचारणारी मला? हे स्मशान आहे. ही काही तुझ्या काकाची प्रॉपर्टी नाही. का लिव्ह ॲण्ड लायसन्सचा करार करून अकरा महिन्यासाठी भाड्यानं घेतलेली नाहीस तू!

सौ : सरळ बोला, माझा काका काढायची गरज नाही. आणि स्मशान भाड्यानं घेण्याची मला काही हौस नाही आलेली. तुमच्या खानदानासाठीच राखीव ठेवलंय ते!

श्री : पुन्हा माझ्या खानदानावर उठलीस तू. काय घोडं मारलंय मी तुझं?

सौ : माझ्यावर पाळत ठेवून माझ्या मागोमाग आलात की नाही तुम्ही इथं?

श्री : मी कशाला तुझ्यावर पाळत ठेवू? रात्री भांडण काढून जेवणावरनं उठवलंस. सकाळी सकाळी पुन्हा भांडण उकरून काढलंस आणि 'मष्णात जा तुम्ही!' असं म्हणाली नाहीस तू?

सौ : 'तू मेलीस की मी सुटलो' असं कोण म्हणालं आधी?

श्री : म्हणालो मी, एकदा का, चांगलं हजार वेळा म्हणालो. काय खोटंय त्यात?

सौ :  तेच म्हणतेय मी.

श्री : पण तेवढं भाग्य कुठाय माझं?

सौ : मी मरायची वाट बघताय, पण मी बरी मरीन अशी.

श्री : मला आधी घालवशील आणि नंतरच जाशील तू!

सौ : मी कशासाठी थांबू मागं? काय डबोलं घेऊन ठेवलंय तुम्ही माझ्यासाठी?

श्री : माझी सगळी मालमत्ता नाशिकच्या पांजरपोळला दान करावी असं म्हटलंय मृत्यूपत्रात.

सौ : तिथल्या त्या गरीब बिचाऱ्या गायी अधिकच हडकून जातील तुमच्या प्रॉपटीला तोंड लावलं तर...

श्री : मेहनतीचा पैसा आहे सगळा.

सौ : पण वटवाघळाच्या तेलाचा वास आहे ना त्याला?

श्री : वासाचा काय संबंध त्याच्याशी आणि असलाच तर तो घामाचा वास असेल, ह लक्षात ठेव! कित्येक वर्षांपासून विकतोय आम्ही ते तेल... आणि काय गं. तुला इतकी वर्ष पोसली, इतकी वर्ष संसार कला, दोन पोरं झाली, तेव्हा आला नाही तेलाचा वास?

सौ : आंधळी झाले होते मी तेव्हा.

श्री : आता सांधेदुखीनं जेव्हा हैराण होशील ना तेव्हा उघडतील परत डोळे.

सौ : कितीतरी औषध आहेत बाजारात. मला नको तुमचं ते उग्र वासाचं, चिकट, गिळगिळीत तेल... तुमचं तुम्हालाच लखलाभ होवो!

श्री : तुझ्या सर्टिफिकेटची गरज नाही मला. आमची 'ढवळीकर यांचं वटवाघाळाचं तेल' ही कंपनी आणि उडत्या वटवाघळाचा लोगो घरोघरी पोहोचलाय महाराष्ट्राच्या. इतकंच काय, इंग्लंड-अमेरिकेपर्यंत कीर्ती पोहोचलीय. लांबलांबनं पैसे पाठवतात लोक.

सौ : एक पैसा नको मला त्यातला... वेळ आली तर धुणीभांडी करीन, मशीनवर कपड़े शिवीन...

श्री : जीवन म्हणजे काही हिंदी सिनेमा नाही... आणि तू म्हणजे काही निरुपा रॉय नाहीस विधवा झाल्यावर कपडे शिवत बसायला... (मशीनचा आवाज काढत ॲक्शन करून दाखवतो.) कट कट कट कट्... टर ऽऽऽ, कट कट कट कट्... टरं ऽऽऽ

सौ : नीट लक्ष द्या, सुई मोडेल बोटात.

श्री : काही दया दाखवण्याची गरज नाही.

सौ : बघाल तुम्ही एक दिवस.

श्री : माझ्या मरणावर उठलीस ना? मग मेल्यावर कसं काय दिसणार मला?

सौ : असं बरं मरून देईन मी तुम्हाला...

श्री : तेच तर म्हणतोय मी! धड जगू देत नाहीस आणि  मरूपण देत नाहीस.

सौ : मरायला हिंमत लागतं माणसाच्या अंगात.

श्री : माझ्यात हिंमत नाही असं वाटलं तुला?

सौ : मग दाखवा ना मरून, दाखवा!

श्री : (वेडावून दाखवत) म्हणे मरून दाखवा! तोंडाला पावडर लावण्याइतकं सोपं आहे का ते?

सौ : उगाच माझी पावडर काढू नका. मुलगा घर सोडून गेला, चारचौघात नाचक्का झाली, त्याचं खापर माझ्यावर फोडायचंय तुम्हाला...

श्री : माझ्याशी पटत नाही तर ‘बाहेर हो' म्हणून कितीदा सांगितलं तुला... गेलीस का तू?

सौ : मी बाहेर पडायची वाटच बघताय तुम्ही. मग त्या ढोबळ्याची बायको आहेच मजा मारायला! मी काही दूधखुळी नाही इतकी!

श्री : (चिडत) ढोबळेवहिनीचं नाव काढू नको, सांगून ठेवतोय तुला. देवमाणसं आहेत ती बिचारी!

सौ : पायाचं तीर्थ घ्या त्यांच्या! म्हण ढाबळेवाहनी!

श्री : कावीळ झालेल्या माणसाला सगळं पिवळं दिसतं...  (आक्रमक होत) आणि मला एक सांग, ढाबळ्यांचे तर काही ऑब्जेक्शन नाही ना मग तू कशाला उगाच त्रास करून घेतेस जीवाला?

सौ : एक नंबरचा बुळ्या माणूस आहेत. तो काय ऑब्जेक्शन घेणार?

श्री : बुळ्या?

सौ : स्वतःच्या बायकाला परपुरुषाबरोबर गंमती जमती करायला प्रोत्साहित करतो, अशा माणसाला 'बुळ्या’ नाहीतर काय म्हणायचं? इतकी वर्ष झाली अजून मूलबाळ झालं नाही ते काही उगाच? (उद्रेकानं) लेंडी पिंपळी मेला...

श्री : तो लेंडी पिंपळी? आणि तू कोण? मुरुडशेंग?

सौ : ह्होऽऽऽ

श्री : त्यामुळंच तुझ्याकडं नुसतं बघितलं तरी पोटात मुरडा मारायला लागता लगेच!

सौ : मी मुरुडशेंग आणि त्या ढोबळ्याची बायको म्हणजे चवळीची शेंग! किती वेळा सांगितलं, तिच्या नादाला लागू नका... काय फरक पडला तुमच्यात?

श्री : (आणखी चिडत) अगं भेटलो असेल तिला एखादवेळ. पण तिच्याच आमंत्रणावरनं, तिच्याच घरी जाऊन! खाल्लं असेल एखादवेळ तिच्या हातचं पण तिच्याच घरी जाऊन तिच्या नवऱ्यासमोर! काय बिघडलं त्यात?

सौ : (फणकाऱ्यानं) निर्लज्जपणा म्हणतात याला!

श्री : शेजाऱ्या-पाजाऱ्यांकडं बघायचं नाही, त्यांच्या घरी जायचं नाही, तिथं चहा घ्यायचा नाही, हा काय प्रकार आहे? तू जात नाहीस का कधी बाहेर? मी विचारलं तुला कधी एका शब्दानं? तुमच्या महिलामंडळातसुद्धा घेत नाही तुम्ही ढोबळे वहिनींना!

सौ : बघा, मेलीनं किती कान भरुन ठेवलंत तुमचे ते! कुठं फेडाल ही पापं?

श्री : शेजारची बाई कधी समोर दिसली तर तिला 'हाय, हॅलो करणं, कधीतरी तिच्याकड चहा घेणं... आणि तेही तिच्या नवऱ्यासमोर, यात कसलं आलंय पाप? मला काही समजत नाही तुझं!

सौ : इथपर्यंतच मजल गेली असती तर मी काही म्हणाले नसते.

श्री : मग काय केलंय मी असं? सांग ना काय केलंय?

सौ : स्वतःला अगदी रामाचा अवतार समजताय तुम्ही. पण आतून कसे आहात ते फक्त मलाच माहिताय.

श्री : (प्रेक्षकांना) मंडळी, बाई-बाटली तर दूरच पण आयुष्यात कधी सुपारीचं खांड खाल्लं नाही, खोटं बोललो नाही. लांडीलबाडी केली नाही, घाम गाळून कष्टाचा पैसा मिळवला... कसं वागावं हिच्याशी? (तिला) तुझं म्हणणं तरी काय आहे ते सांगून टाक एकदा म्हणजे झालं... जगूही देत नाहीस आणि मरायला आलो त मरूही देत नाहीस.

सौ : तुम्ही आत्महत्या करून मोकळ होणार आणि पोलिस, कोर्ट-कचेऱ्या मला एकटीला निस्तरायला लावणार. वा रे वा! ते काही नाही, तुम्हाला जर मरायची एवढी होस आली असेल तर मलाही सोबत घेऊन मरा, लग्न केलंयत ना माझ्याशी? तुम्हीच मागं लागला होतात ना लग्नाच्या आधीपास्नं? मग आता का पळून जाताय शेपुट घालून?

श्री : शेपूट घालून? (तिच्या हाताला धरून ओढत ) ती चूक दुरुस्त करून टाकतो आता, चल त्या डोंगरावर जाऊ आणि तिथनं उडी मारू खाली.

सौ : माझा विश्वास नाही तुमच्यावर, मला ढकलून मोकळं व्हाल तुम्ही.

श्री : मग ती चिता जळतेय ना तिकडं, तिच्यात उडी मारू दोघंही, चल! लोक मंदीरपण उभारतील तुझं नवऱ्याबरोबर सती गेली म्हणून!

सौ : हॉ... एवढे लोक उभे आहेत आजूबाजूला ते उडी मारू देतील आपल्याला? काहीतरीच काय बोलताय?

श्री : मग विष घेऊ या? तुझा विश्वास नसेल तर मी घेतो आधी, झालं?

सौ : खात्रीचं विष मिळतंय कुठं हल्ली? आणि डॉक्टर अगदी न चुकता धावून येतात अशावेळी... अब्रूचे धिंडवडे निघतात मग!

श्री : मग झोपेच्या गोळ्या घेऊ या? (खिशातून बाटली बाहेर काढत) येताना घेऊनच आलोय सोबत.

सौ : बराच वेळ लागतो त्यानं मरायला. मरण कसं अगदी कमी त्रासात आणि झटक्यात आलं पाहिजे!

श्री : मग लाईटचा शॉक हा एकच मार्ग आहे आता! (करून दाखवत) ही इकडं अशी थ्री प्लग पिन लावायची, वायरचं दुसरं टोक असं हातात धरून ठेवायचं, तू मला घट्ट पकडून ठेवायचं, मी इकडचं बटन दाबायचं आणि, खेळ खल्लास ! (कृती करून दाखवतो. दोन तीनदा प्रयत्न करतो.) खट खट खट्... खट खट खट्... (काहीही झालेलं नाही. निराशेनं) चॅयला, तुला सोबत घेऊन मरायचं म्हणजे फ्यूज उडणार हे लक्षातच नाही आलं!

सौ : आपण असं करू–

श्री : काय?

सौ : तिकडं खाली नदीवर जाऊ, दोघांच्याही गळ्यात एक मोठ्ठी घोंड बांधू आणि एकदमच उडी मारू!

श्री : ही आयडिया बरी आहे पण नदीला पाणी कुठाय?

सौ : खरंच की, नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्नं!

(बोलता बोलता समाधी क्रमांक दोनजवळ जातो आणि तिथं कोपऱ्याला क्षणभर टेकतो. संगीताचा एक वेगळा तुकडा ऐकू येतो आणि लगेच वातावरणाचा मूड बदलू लागतो. आता श्रीही प्रेमळ मूडमध्ये...)

श्री : बोलून बोलून घसा सुकला माझा... पाणी देतेस का जरा?

सौ : मरायला आलात ना इथं?

श्री : हो, पण म्हणून काय पाणी प्यायचं नाही? आणि अनायासे तू आहेस इथं म्हणून मागतोय... दे की... प्लीज–

सौ : आधी शिव्या द्यायच्या आणि गरज पडली की पाय धरायचे.

श्री : भूकपण लागलीय खूप. रात्रीपास्नं पोटात अन्नाचा कण नाही. दे ना काहीतरी.

( बोलता... बोलता सौ. समाधी क्रमांक दोनच्या हद्दीत जाते. संगीताचा तोच तुकडा पुन्हा ऐकू येतो. तिचाही मूड बदलून प्रेमळ होऊ लागतो. )

सौ : सकाळी उठून चांगले पराठे करणार होते पण वादावादी सुरू केलीत तुम्ही.

श्री : कुणी सुरू केली वादावादी? मी? आता पुन्हा भांडण उकरून काढू नको, खायला काय असलं तर बघ!.

(सौ. ढवळीकर आता अधिक बदललेल्या "बरं बरं, देते हं, धीर धरा थोडासा " असं म्हणत त्या समाधीच्या मागच्या बाजूनं एक मोठं बास्केट आणि त्यातून पाच खणांचा एक स्टिलचा मोठा डबा, पाण्याची बाटली, पेपर डिशेस, चमचे असे साहित्य काढून वर ठेवतात. श्री आश्चर्यचकीत. )

सौ : हा डबा, ही बाटली पाण्याची, आणि ह्या ताटल्या!

श्री : वा, वा, क्या बात है... मानलं पाहिजे तुला अगदी. काय, काय आणलंस डब्यात?

सौ : (एकेक पदार्थ बाहेर काढून त्याला वाढत ) मेथीचे पराठे, चटणी, लोणचं, मुरंबा...

श्री : वा, अगदी पिकनिकला आल्यासारखं वाटतंय.

(ती श्री. ना ' घ्या' असं म्हणत एक प्लेट देतं. श्री प्लेट हातात घेऊन श्लोक म्हणू लागतो.)

श्री : 'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे

सहज हवन होते नाम घेता फुकाचे...'

(सौ.ला) कर सुरू,(ती विचारात) काय झालं? घे की!

सौ : स्मशानात खायचं म्हणजे– करांतरीच वाटतंय हो अगदी!

श्री : भूक महत्त्वाची का स्मशान? काही होत नाही. घे!

सौ : पण कुणी बघितलं तर काय म्हणेल?

श्री :  कुणी काही म्हणत नाही. ते सुभाषित माहीत आहे ना तुला?

सौ : कोणतं?

श्री : बुभुक्षितः किं न करोति पापम्?

सौ : हूं...

श्री :  घे, आणि बघायला कोण मोकळं आहे इथं? स्मशानातील सगळी भुतं सकाळी सकाळी कामावर निघून जातात.

सौ : पण त्यांची मुलं असतील ना?

श्री : ती जातात शाळेत.

सौ : आणि बायका?

श्री : (चिडत) त्या जातात सिनेमे बघायला...

सौ : काहीतरी बोलू नका हो... स्मशान म्हटलं की भुतं आलीच!

श्री : आणि असली तरी ती इथं  कशाला थांबतील आपण असल्यावर?

सौ : ज्योक मारू नका!

श्री : (उठत) तू अशी एकणार नाहीस. ( समाधीवर उभा राहून इकडं-तिकडं पहात ) तीऽऽऽ तिकडनं येणारी एक प्रेतयात्रा... त्याऽऽऽ तिथं नदीच्या काठावर मुंडन करणारी काही माणसं आणि पिंडाच्या शोधातले ते ऽऽऽ काही कावळे सोडले तर चिटपाखरूसुद्धा नाही इथं. झालं समाधान? घे आता! (स्वतः एक घास घेतो. छान चवीमुळे खुश होत–) वा! क्या बात है, (प्रेक्षकांकडे पाहात) मंडळी, या बायका एकीकडून प्रचंड भांडतात आणि दुसरीकडून प्रचंड प्रेमही करतात, नाहीतर इतकं छान जेवण कशाला करुन आणलं असतं हिनं? नशीब असतं एकेकाचं... (तिला) देव तुझं भलं करो, वा! (मिटक्या मारत) वा!

सौ : पाच मिनिटांपूर्वी आपण भांडत होतो यावर कुणाचा विश्वास बसेल काय हो?

श्री : अरे हो खरं की! मी सुद्धा विसरून गेलो अगदी.

सौ : असा कसा काय बदल झाला एकदम तुमच्यात?

श्री : आणि तुझ्यात नाही झाला?

सौ : हो खरंच की!

श्री : मला वाटतं–

सौ : काय?

श्री : आपण ज्या समाधीवर बसलोय ती बहुतेक एखाद्या प्रेमळ जोडप्याची असणार. रोमियो- ज्युलिएट, शिरी-फरहाद, सोनी-महिवाल, अगदीच नाही तर वासू-सपना टाईप एखादं प्रेमी युगुल चीरविश्रांती घेत असणार इथं...

सौ : घ्या! (पराठ्याचा एक घास देते )

श्री : आता मात्र खात्रीच झाली.

सौ : आपण इतकी वर्ष राहातोय या गावात पण स्मशानात येण्याचा योग काही आला नव्हता कधी.

श्री : अगदी एखाद्या तीर्थस्थळाला भेट द्यायची राहून जावी तसं बोलतेयस... मी अनेकदा आलोय इथं अंत्यविधीच्या निमित्तानं.

सौ : तुम्हा पुरुष मंडळींना यावंच लागतं. पण इथं किती निवांत वाटतं नाही हो?

श्री : खरंय, पण खरी गर्दी आणि गडबड असते ती तिथं खाली. रोज चारपाच तरी चिता जळत असतात. आपण बसलोय ही दफनभूमी. इकडं गर्दी थोडी कमी.

सौ : ते  का?

श्री : आपल्या धर्मात अनेक पंथ असे आहेत की जे मृतांचं दहन न करता दफन करतात. काहीजणानी तर मृत्यूपत्रात दफनाची इच्छाच व्यक्त केलेली असते. त्यांना इकडं आणावं लागतं...

सौ : अस्सं...

श्री  : मला एक सांग, नेमकी कशी काय आलीस तू माझ्या पाठोपाठ इथं?

सौ : तुम्ही डोक्यात राख घालून बाहेर पडलात तेव्हाच अंदाज आला मला की तुम्ही आता सरळ स्मशानात जाणार. मग मीही आवरलं, घेतलं देवाचं नाव आणि अंदाजानंच येऊन पोचले इथं... म्हटलं आपणपण जीव देऊन टाकावा सोबतच!

श्री : भीती नाही वाटली इथं येताना?

सौ : मरायचं म्हटलं की भीती कशाला? आणि स्मशानातच जाऊन मेलं म्हणजे पुढचा त्रास नको...

श्री : ओके, ओके, समजलं...  भलतं-सलतं काही बोलू नको. जेवताना असल्या विषयांवर बोलायची पद्धत नाही आपल्याकडं!

सौ : अहो पण त्या गोष्टी कुणाला चुकल्यात का?

श्री : तेही खरंच म्हणा!

सौ : (खाताना) भुतं जेवणात काय खात असतील हो?

श्री : तंगडीवडे!

सौ : तंगडीवडे?

श्री : आपण जसे कोंबडीवडे खातो ना आवडीनं तशी तंगडीवडे खातात भुतं. एखादा माणूस त्यांच्या तडाख्यात सापडला की ते त्याची तंगडी काढून अशी बेसनाच्या पिंपात बुचकळून काढतात आणि उकळत्या तेलात टाकून, खरपूस तळून, बाहेर काढून अशी (तसे खाऊन दाखवत-) अगदी गरम गरम खातात!

सौ : उगाच कल्पनेच्या भराऱ्या काय मारता?

श्री : काहीतरीच काय त्याच्यात? शेवटी माणसांचीच भुतं ना ती? त्यांना अशा कल्पना सुचणारच!

सौ : भुतं नाटकं पाहात असतील का हो?

श्री : प्रश्नच नाही! त्यातही मराठी भुतांचा नंबर पहिला!

सौ : उगाच काहीतरी थापा मारू नका.

श्री : अगं त्यात कसल्या थापा मराठी माणसाचं नाटकवेड इतकं टोकाचं आहे की मेल्यावरही ते पाठ सोडत नाही त्याची.

सौ : खरं की काय?

श्री : आणि तुला मराठी भुतांचं आवडतं नाटक कोणतं माहिताय का?

सौ : कोणतं?

श्री : धुक्यात हरवली वाट!

सौ : अगबाई, ते कसं काय?

श्री : सारखी एकमेकाला शोधत बसतात धुक्यात. आरपार एकातून दुसरं गेलं तरी पत्ता लागत नाही. (दोघेही हसतात)

सौ. : (डबा साफ करायला समाधी क्रमांक तीनच्या हद्दीत जातं आणि त्या समाधीजवळ क्षणभर उभी राहाते. संगीताचा आणखी एक वेगळा तुकडा पुन्हा वाजतो. तिचा मूड आणखी थोडा बदलतो.) तुम्हाला आठवतं?

श्री : काय?

सौ : लग्न झाल्यानंतर चौथ्या महिन्यात पिकनिकला गेलो होतो आपण.

श्री : तेव्हा तुला पाचवा लागला होता.

सौ : (वैतागत) आठवणीत रहावं असं दुसरं काहीच घडलं नव्हतं का?

श्री : ज्याची जन्मोजन्मी आठवण राहावी अशी एकमात्र घटना होती ती!

सौ : सारखं सारखं काढून दाखवण्याची काही गरज नाही. तुमचीच घाई चालली होती लग्नाच्या आधीपास्नं. काहीतरी जगावेगळं करून दाखवायचं होतं तुम्हाला.

श्री : तेही खरंच आहे म्हणा. तरुण वयात डोक्यात वारं भरलेलं असतं अगदी.

(डब्बा आवरून ठेवायला मदत करता करता तिच्याजवळ जाऊन उभा राहातो. संगीताचा तोच तुकडा पुन्हा वाजतो. त्याचाही मूड बदलू लागतो.)

सौ : स्मशानात जेवणं ही किती थ्रिलिंग आयडिया आहे, नाही?

श्री : काय म्हणालीस?

सौ : जीवनात काहीतरी थ्रिलिंग पाहिजे असं तुम्ही नेहमी म्हणायचात.

श्री : त्यामुळंच तर लग्नाच्या आधी हनीमून झाला आपला. (श्री हसतात.)

सौ : भलतेच रोमॅण्टिक झालाय...

श्री : आणि तू नाही झालीस?

सौ : खरंच, काहीतरी बदल झालाय आपल्यात एवढं खरं... (उत्साहानं) तुम्हाला आठवतं? दत्ताच्या देवळात जायच्या निमित्तानं आपण रोज संध्याकाळी नदीवर जायचो आणि मग तिथल्या घाटावर बसून आपलं ‘गुटुर  गुटुर’ सुरू व्हायचं...

श्री : नद्यांच्या काठावरची दत्ताची देवळं याच उद्देशानं बांधलेली असतात सगळी... (दोघंही हसतात)

सौ : या समाधीपाशी उभं राहिल्यापास्नं सगळ्या जुन्या आठवणी यायला लागल्यात मनात.

श्री : खरंच की! काय भानगड आहे काही कळत नाही. इथली प्रत्येक समाधी आणि तिचा परिसर कोणत्या ना कोणत्या भावनांशी निगडित आहे, असं दिसतंय! मगाशी आपण संताप विसरून प्रेमळ मध्ये गेलो आणि इथं आल्यावर भूतकाळातील आठवणी येऊ लागल्या आहेत!

सौ : हो ना!

(छान संगीत. प्रकाश बदलू लागतो. 'सावनका महिना पवन करे शोर' हे गाणं पार्श्वभूमीवर सुरू होतं. त्या समाधीची आता जण होडी झालेली. ती होडीत दुसऱ्या टोकाला बसली आहे. समाधीच्या बाकड्याला आधीच खालून चाकं ठेवलेली आहेत. त्यामुळं होडी हलल्याचा परिणाम साधता येतो. बाकड्यामागं आधीच ठेवलेल्या एका बादलीतील पाणी ती अधून-मधून वर उडवते आणि त्यामुळं वातावरण निर्मितीस चांगली मदत होते. समाधीमागच्या पोकळ भागातून एक शेला काढून त्यानं तो आपल्या कमरेला गुंडाळलेला आहे. मागून एक मोठा बांबू काढून होडी पाण्यात ढकलल्याची ॲक्शन करून तो होडी वल्हवण्याची अक्शन करीत आहे. एक कडवं संपतं. दोघंही आठवणीतून बाहेर येतात.)

सौ : (भानावर आल्यागत ) एकदम डोकं गरगरल्यासारखं झालं काहो तुम्हाला?

श्री : (तोही भांबावलेला) काय झालं?

सौ : एखादी कॅसेट रिवाइंड करून भूतकाळात जाऊन यावं तसं झालं काहीतरी.

श्री:  मलाही जाणवलं तसंच काहीतरी.

सौ : काही भुताटकी तर नाही ना झाली?

श्री : खरं दिसतंय तुझं म्हणणं, पण स्मशानात भुताटकी नाय तर दुसरं काय होणार?

सौ : माझ्याही मनात जुन्या आठवणींनी गर्दी करायला सुरुवात केली बघ...

श्री :  आपण पळून कसं गेलो आणि गणपतीपुळ्याला जाऊन लग्न कसं करून आलो ते आठवतंय ना?

सौ : 'दिवार' पिक्चर लागला होता तेव्हा. त्यातलं ते शशी कपूर, नितू सिंगचं गाणं आठवतंय ना? शशी कपूर नितू सिंगला जशी स्कूटरवरनं घेऊन जातो अगदी थेट तसं तुम्ही मला मोटारसायकलवर टाकली आणि थेट गणपतीपुळ्याला घेऊन गेलात.

श्री : आपलं लग्न ठरावं यासाठीच जणू निर्मात्यानं काढला होता तो पिक्चर!

( दोघंही मोकळेपणानं हसतात. प्रकाश बदलतो. "तेरा मुझसे है पहले का नाता कोई" हे गाणं सुरू होतं. त्या समाधीची आता जणू मोटरसायकल झालेली. तो मागच्या पोकळ भागातलं हेल्मेट काढून डोक्यावर घालतो. समाधीवर टांग टाकून बसतो... ड्राईव्ह करत असल्याची ॲक्शन करू लागतो. ती प्रेक्षकांकडे पाय सोडून बसलेली आहे. मोटरसायकल सुरू झाल्याचा आवाज. मोटारसायकल सुरू असल्याचा भास निर्माण व्हावा इतपत समाधी हलते. प्रकाश बदललेला. एक कडवं संपतं. क्षणभर अंधार. हळूहळू पूर्ण उजेड. दोघंही पुन्हा वास्तवात येतात. )

श्री : आता पुन्हा काही घडलं का ग इथं?

सौ : मलाही तसंच वाटलं... चला, ही जागा बदलूया आपण आधी, चला!

( दोघंही पुन्हा पहिल्या समाधीजवळ जातात. संगीताचा नवा तुकडा वाजतो.)

सौ : भूतकाळातनं वर्तमानात आल्यासारखं वाटतंय इथं...

श्री : म्हणजे गोड आठवणीवर पाणी सोडून पुन्हा भांडायला लागायचं असंच ना?

सौ : झालीच की सुरुवात भांडणाची!

श्री : तूच केलीस ती!

सौ : बंड्या घर सोडून निघून गेला त्याला वर्ष झालं आता. या वर्षात एक दिवस तरी भांडणाशिवाय गेला का तुमचा, सांगा?

श्री : (तिरकसपणे) होऽऽऽ

सौ : तो गेल्यापास्नं मानसिक संतुलन बिघडलं माझं.

श्री : तुझ्या लाडामुळं बिघडला तो!

सौ : तुम्हाला त्याच्याकडं लक्ष द्यायला वेळ नव्हता.

श्री : कारण तुझं लक्ष असायचं त्याच्यावर!

सौ : तुम्हाला सांधेदुखी, पेशंट्स आणि ते तेल या पलिकडं काहीच दिसलं नाही कधी. उडत्या वटवाघळाच्या लोगोचं जेव्हढं कौतुक केलं असेल तितकं स्वतःच्या मुलाचं केलं नसेल कधी.

श्री : तुझ्या त्या सोशल वर्कच्या नादातनं तू वेळ काढला असतास थोडा तर? पण नाही!

सौ : उगाच माझं सोशल वर्क काढू नका! त्या दिवशी तुम्ही त्याच्या थोबाडीत मारली नसतीत तर कशाला पळून गेला असता तो?

श्री : काही काम न करता फुकटचं खात बसायचा, काही विचारलं तर उलट उत्तर द्यायचा... त्या दिवशी असंच झालं, माझा  संताप अगदी अनावर झाला आणि दिली ठेवून!

सौ : मुलगा मोठा झाला की त्याला मित्रासारखं वागवायचं असतं.

श्री : माहिताय मला पण दिली एक थोबाडीत तर त्यात काय बिघडलं? बापाला एवढा पण हक्क नसता का?

सौ : बापाची कर्तव्यही असतात काही!

श्री : कॉम्प्युटर इंजिनिअर केला, अजून काय करायला हवं होतं? चांगलं अफलातून डोकं आहे त्याचं. कुठंही चार पैसे मिळवील, काही उपाशी मरत नाही तो!

सौ : कसा राहात असेल हो बंड्या? कुठं जेवत असेल? साधा चहा करता येत नाही त्याला. अंघोळ करून बाहेर आला तर केसही मला पुसून द्यावे लागायचे. (हुंदका)

श्री : काही लहान नाही तो आता... आणि स्वतःच्या मर्जीनं निघून गेलाय. मजा मारत बसला असेल मैत्रिणीबरोबर. तू  नको काळजी करू.

सौ : (हुंदका देते)

श्री : आता रडून काही फायदा होणार आहे का?

सौ : लग्न पण करून बसला तिकडंच, वर पत्रिका पाठवली पुरावा म्हणून! कुणामुळे?

श्री : आता दोषी कोण याचं खापर एकमेकावर फोडत बसण्यात काही अर्थ आहे का? हजारदा सांगितलं पण ऐकत नाहीस तू. आज इथं आलो जीव द्यायला, तर इथंही आलीस! आणि लग्न झालंय त्याचं हे तरी खरं आहे का?

सौ : मग ते पत्रं? ती लग्नपत्रिका–

श्री : केलं असेल तर करू दे... आपण कुठं आपल्या घरच्यांची परवानगी घेतली होतो?

सौ : (रडू लागते) ती ढाबळ्याची बायको माझ्याकडं बघून फिदी फिदी हसत होती...

श्री : याचं दुःख जास्त आहे तर तुला!

सौ : तुम्हाला गंमत वाटते. पण तिच टोमणे कसे असतात, ते फक्त मलाच माहीत. दुःखावर मीठ चोळावं तशी नजर आहे मलीची. तुम्हाला त्याचं काहीच नाही.

श्री : अगं काय चाललंय तुझं?

सौ : तिच्याशी बोलताना हास्यविनोद सुचतातच कसे तुम्हाला हे कळत नाही मला...

श्री : अगं कसं समजावून सांगू तुला, हे बघ, किचनमध्ये कोंडलेला धूर बाहेर जावा म्हणून आपण एक्झॉस्ट फॅन बसवून घेतलाय की नाही घरी?

सौ : हो मग?

श्री : मग तसाच तो एक 'एक्झॉस्ट फॅन आहे असं समज. तिच्याकडं बघितलं की मनातले भलते सलते विचार वाफ होऊन उडून जातात माझे.

सौ : असं काय?

श्री : आपल्या मानसिक आरोग्यासाठी गरज असते त्याची.

सौ :  पण मनात भलते-सलते विचार यावेतच का म्हणते मी?

श्री : म्हणजे काय? माणूस आहे मी, देव नाही.

सौ : आणि मी नाही माणूस? मी वागले कधी गैर?

श्री : तुझ्याशी बोलायचं म्हणजे दगडावर डोकं आपटून घेण्यासारखं आहे.

सौ : अगदी 'फोडून' सांगायला पाहिजे का प्रत्येक गोष्ट?

श्री : (नेमके काय त्याला कळलेले नाही)

सौ : अहो ती वांझोटी बाई जाळ्यात पकडण्याचा प्रयत्न करतेय तुम्हाला... लक्षात कसं येत नाही तुमच्या?

श्री : शीऽऽऽ तुझं हे असलं बोलणं ऐकूनच जीव देण्याचा निर्णय घ्यावा लागला मला. परवा कारखान्यात लाखाचा हिशेब चुकला. घरी परत येताना ट्रक अंगावर आला तरी लक्षात आलं नाही. मरता मरता वाचलो...

सौ : मरायलाच आलाय ना इथं?

श्री : हो!

सौ : पण मरण्याच्या ऐवजी जगण्याचाच विचार जास्त करताय की नाही तुम्ही?

श्री : अगं हो, खरंच की! (प्रेक्षकांना) बघा मंडळी, जीवनाला टाटा करायला जावं तर ते अधिकच जवळ यायला लागतं आणि त्याला जवळ घ्यायला जावं तर लांब लांब पळायला लागतं. (बोलता बोलता समाधी क्रमांक चारजवळ जातो. संगीताचा वेगळा तुकडा वाजतो. या समाधीजवळ माणूस एकदम रामॅण्टिक होतो आणि भूतकाळात जातो.) या लपंडावातच तर जीवनाचा खरा अर्थ दडलेला नाही ना? ( काही क्षणांनी) येस... असं जर असेल तर मग जास्त चिंता करत न बसता फक्त वर्तमानातच जगणं खरं शहाणपणाचे आहे. आताचा हा जो क्षण आपण जगताय तो आनंदानं साजरा करणं महत्वाचं... बस्स! (दोन्ही हात वर करून पोज घेत) आय लव्ह यू डार्लिंग!

सौ : का? माझं नाक म्हणजे बटाटावडा, तोंड म्हणजे लोहाराचा भाता ना?

श्री : जाऊ दे गं गंमत केली थोडी. ये इकडं... इथं आलं की एकदम रोमँटिक व्हायला होतं बघ!

( तीसुद्धा समाधी क्रमांक चारजवळ जाते. तोच संगीताचा तुकडा वाजतो. क्षणभर अंधार. पुन्हा प्रकाश येतो तेव्हा ती गरोदर असल्याचे स्पष्ट दिसते. दोघंही जुन्या आठवणीत मग्न. )

सौ : दिवस कसे भर्रकन गेलं ते कळलंसुद्धा नाही.

श्री : काय एवढ्या लवकर दिवससुद्धा गेले?

सौ : (प्रेक्षकांना) नाटक जर गतिमान ठेवायचं तर अशी आयडिया करावीच लागते बरं का मंडळी!

श्री : हो हो, हे मात्रं अगदी बरोबर बोललीस तू!

सौ : बाळंतपणाच्या वेळी किती घाबरले होते मी. वाटलं काय होतंय नी काय नाही! पोट जसंजसं दिसायला लागलं तसतशी काळजी वाटायला लागली. नको तो बायकांचा जन्म असाही विचार यायचा अधून मधून डोक्यात. पण शेवटी आई व्हायचं म्हणजे थोडा त्रास सहन करावाच लागणार होता. अखेर दवाखान्यात जाण्याची वेळ आली...

( तिचं बोलणं सुरू असताना त्यानं नेपथ्यात जुजबी बदल केला आहे. मुख्य समाधीचं आता हॉस्पिटलमधील कॉटमध्ये रुपांतर झालं आहे. समाधीवरील काळं कापड आता उलट करून टाकल्यामुळे हॉस्पिटलमधील टिपिकल हिरव्या चादरीत रूपांतरित झालेलं आहे. )

श्री : चल... चल म्हणतो ना!

सौ : मला भीतीच वाटते हो दवाखाना म्हटलं की.

श्री : त्यात काही घाबरण्यासारखं नाही. चल, हळू हळू!

( तो तिला हाताला धरून आधार देत हळूहळू रंगमंचावर एक पूर्ण फेरी मारून हास्पिटलात घेऊन ती चालत येताना हे संवाद.. )

श्री : एरवी इतक्या रिक्षा असतात आजूबाजूला, पण आता गरजेच्या वेळी एक दिसेल तर शपथ.

सौ : नाटककाराची क्लृप्ती आहे ती, दुसरं काही नाही.

श्री : म्हणजे?

सौ : मी गरोदर आहे हे प्रेक्षकांना दाखवायचं तर मला चालायला लावणं आवश्यक नाही का?

श्री : अरे हो, अगदी बरोबर ओळखलंस!

सौ : ( चालताना थोडी लटपटते) आई ऽऽऽ

श्री : सावकाश, पाय घसरेल.

सौ : आता आणखी कुठे घसरायचा राहिलाय?

श्री : ते ही खरंच म्हणा!

(ती हळू हळू वर चालत खाटेजवळ येते. समाधीमागील एक उशी तो तिच्या मानेखाली देता. मागून एक चादर काढून तो तिच्या अंगावर घालतो. पोटावर आधीच घेतलेल्या उशीमुळीतचं पोट वर आलेलं दिसत आहे.

बाकड्याच्या मागं एक सलाईन स्टँड आडवा ठेवलेला असतो. तो तो स्टँण्ड उभा करतो. त्याला सलाईनची एक वाटली आधीच लटकावून ठेवलेली आहे. तिच्या टोकाची लांबलचक नळी तो तिच्या मनगटावर टेपनं डकवतो, जणू तिला सलाईन लावलेलं आहे. मागचं छोटं स्ट्रल पुढं ओढून तो बाजूला पुस्तक वाचत बसतो. संगीताचा छोटा तुकडा वाजतो. पूर्ण प्रकाश.)

सौ :  अहोऽऽऽ

श्री : काय झालं?

सौ : मी आता जगत नाही यातनं.

श्री : काही काळजी करू नका, होईल सगळं नीट.

सौ : डॉक्टर म्हणाले ना, सिझेरियन करावं लागेल म्हणून?

श्री : डॉक्टर हल्ली सगळ्यांनाच सांगतात तसं, त्यात नवीन काय?

सौ : एवढं मोठं ऑपरेशन करायचं म्हणजे भीती–

श्री : सिझेरियनमध्ये कसलं आलंय मोठं ऑपरेशन? डॉक्टर मंडळी खूप एक्सपर्ट झालीयत हल्ली!

सौ : बायकांची दुःखं कळायची नाहीत तुम्हाला, तुम्हाला सगळीच गंमत वाटतं.

श्री : बरं, सॉरी!

सौ : (एकदम किंचाळत) अगं आई गं ऽ आई आई... ओऽऽऽ

श्री : कळा यायला लागल्या का? आणू बोलवून डॉक्टरांना?

सौ : बाळ लाथा मारतय आतनं...

श्री : जन्माला आलं नाही अजून तरी लाथा मारतंय, मोठं झाल्यावर काय करील परमेश्वराला माहीत!

सौ : माझी एक इच्छा होती–

श्री : काय?

सौ : आपल्याला जर मुलगा झाला तर त्याचं नाव प्रसाद ठेवायचं.

श्री : गणपतीपुळ्याचा प्रसाद-

सौ : तुम्हाला चेष्टा वाटते प्रत्येक गोष्टीची.

श्री : मुलगी झाली तर?

सौ : आरती ठेवू या!

श्री : लग्नाच्या आधीच 'आरती ओवाळली' म्हणून!

सौ : मला नाही तुमच्याशी बोलायचं... ज्जा!

श्री : अग पण आधी बाळ तर होऊ दे, का इथंच स्मशानात बारसं घालू? सगळ्या भुतांना आमंत्रण देतो... रात्री वेताळाच्या नाचाचा कार्यक्रम ठेवू. (रांभा होऽ होऽ होऽ, संभा होऽऽ होऽऽ होऽऽऽ करत अंगात आल्यासारखा विडंबनात्मक नाचू लागतो.)

सौ : (आठवण करून देत) अहो असं काय करताय? स्मशान कुठायं हे, हॉस्पिटल नाही का?

श्री : अगं हो... खरंच की. बेअरिंग सुटलं वाटतं माझं... (प्रेक्षकांना) सॉरी हं मंडळी...

सौ : (कळवळत) आईगऽऽऽ वेळ भरत आली वाटतं. 'येते' मी...

श्री : अगं चार पावलं चालता येत नाही तुला, कुठं चाललीस ?

सौ : 'येते' म्हणजे 'जाते'.

श्री : कुठं जाते?

सौ : देवाघरी चालले मी.

श्री : देवांची तर कधीच बदली झाली दुसऱ्या गावी. रिकामं आहे ते घर सध्या.

सौ : त्या देवांचं नाही म्हणत मी.

श्री : मग?

सौ : वर... वरती... वरच्या देवाचं म्हणतंय मी!

श्री : वरती तर जामसंडेकर राहातात आपल्या, विसरलीस का?

सौ : अहो असं काय करताय, वर म्हणजे स्वर्गात म्हणतेय मी!

श्री : असं होय? पण लग्नाच्या आधीच नको त्या भानगडी करून बसलीस तू. स्वर्गात कोण जागा देणार तुला?

सौ : (ठणठणीतपणे वर उठत) तुमच्या अशा बोलण्यानं ठरलेल्या वेळेपेक्षा पाच मिनिटं आधीच मरेन मी!

श्री : अगं हळू. बाळंत व्हायचंय तुला आता... तुझ्या या आदळाआपटीत बाळाला काही झालं तर?

सौ : अगबाई खरंच, माझंही बेअरिंग सुटलं वाटतं... (प्रेक्षकांना) सॉरी हं... (पुन्हा पडून राहाते. काही क्षणांनी) अहोऽऽ

श्री : काय?

सौ : (त्याचा हात हातात घेत.) मी मेल्यावर तुम्ही–

श्री : (तिला बोलू न देता ) दुसरं लग्न अजिबात करणार नाहा. असं रात्रीच्या वेळी झोपेचं खोबरं करून हॉस्पिटलमध्ये येण्याची हौस नाही आली मला! आणि या बायका पण रात्री अपरात्रीच बाळंत का होतात हे फक्त त्या परमेश्वरालाच माहीत.

सौ : आपण केलेल्या (पोटाकडे बोट दाखवत) या असल्या अभिमानास्पद कृत्याबद्दल दिवसाउजेडी लोकांना तोंड दाखवायची लाज वाटते दुसरं काय?

श्री : आता मात्र शहाण्यासारखं बोललीस अगदी!

सौ : (कळा देत) अया ई ग SSS चालले मी. आपल्या बाळाची नीट काळजी घ्या. तळहातावरच्या फोडासारखं जपा त्याला. आईऽऽऽ आईऽऽऽ... (संगीताचा एक तुकडा वाजता. ती तळमळत आहे. तो उठून पुढं येत पुढील स्वगत म्हणतो)

श्री : मंडळी, संसाराच्या नाटकातले हे ठरलेले प्रसंग आणि ठरलेले डायलॉग.

पाऊस येतो, माती गंधित होते बी रुजतं फुलतं फळतं

नंतर त्या झाडाची पानं पिवळी होतात गळून पडतात.

तसंच माणसाचं...

आपला तळहात म्हणजे सर्वात सुरक्षित आणि तितकीच सुकुमार जागा आपल्या लाडक्यांसाठी राखीव असते जणू! तशी वहिवाटच आहे असं म्हणा ना. आपण आपल्या मुलांना तळहातावरच्या फोडासारखं जपायचं त्यांचं पालन-पोषण करायचं दुखलं खुपलं पाहायचं शाळा-कॉलेज सारं काही पाहायचं... आणि मग एक दिवस अचानक तळहातावरचा तो फांड फुगतो आणि ठणकायला लागतो त्यात पू होता आणि मग तो फोडून टाकण्याशिवाय दुसरा काही पर्याय राहात नाही.

आपल्या मनाची तयारी नसते पण आधी हात आणि मग सारं अंग बधिर व्हायला लागतं मग पर्यायच राहात नाही... आपण निर्णय घेईपर्यंत परिस्थितीचा काटा लागून फोड फुटतो. पू वाहून जातो जखम ठणकायची थांबते आणि आपण भानावर येतो. आपल्या लक्षात येतं की शेवटी माणूस एकटाच असतो. अगदी एकटा, एकाकी, निराधार... जिला आपण आपलं मानलं ती बायकोसुद्धा आपली नसते!

सौ : (किंचाळू लागते) आई ग ऽऽ– अ या ई ऽ ओ ऽ देवा!

श्री : काय झालं? अगं काय झालं?

सौ : मेले, मेलेऽऽ धावा, वाचवाऽऽ

श्री : अगं काय झालं काय? आणू का बोलावून डॉक्टरांना?

सौ : (भ्रमिष्ट झाल्याप्रमाणं) बाळ... बाळ कुठाय माझं? आणा हो आणा त्याला माझ्याकडं, घेऊन जाईल कुणीतरी... तोडू नका त्याला माझ्यापासून... धावा... वाचवा... आणून द्या माझं बाळ मला. माझ्या रक्ताचं, माझ्या हाडा-मांसाचं–

श्री : अगं कसलं बाळ आणि कोण तोडतंय त्याला तुझ्यापासून? (तिच्या पोटावरची उशी ओढून काढत ) ही तर उशी आहे नुस्ती. साधा रक्ताचा डागसुद्धा नाही एखादा. हाडा-मांसाचं काय घेऊन बसलीस? कसला तरी भास झाला असेल तुला. उठ... उठ... (हळूहळू पूर्ण प्रकाश येतो. पुन्हा ते मागच्या प्रसंगाशी जोडले गेले आहेत.)

सौ : (एकीकडे येऊन ती पुढील स्वगत बोलू लागते. तोवर श्री ढवळीकर नेपथ्य पूर्ववत करून ठेवत आहेत.) भास झाला वाटतं... खरंच मंडळी, भास झाला... काय खरं आणि काय खोटं हे कधी कधी लक्षातच येत नाही. कधी अंधार करणारे काळेकुट्ट ढग तर कधी प्रसन्न करणारा लख्ख प्रकाश. कधी सुखाचा वर्षाव तर कधी संकटांची मालिका... जीवन आपल्याला भंडावून सोडतं, व्याकुळ करतं, कधी वाटतं उत्तर सापडलं पण तोवर नवे प्रश्न निर्माण झालेले असतात आणि प्रश्नांच्या मागं लागावं तर उत्तरं फेर धरून नाचायला लागतात. एखादा न सुटणारा उखाणा असावा तसं असतं जीवन.

साध्या तापाचं निमित्त होऊन आरती गेली पण तिचा साधा ताप काळजाला असा चटका लावून गेला की त्या तडफडाटानं साऱ्या आयुष्याची होळी झाली... आणि बंड्या! तळहातावरच्या फोडासारखं जपलं त्याला पण मायेचं रेशमी नातं जणू  दावं असावं तसं तोडून वारं भरलेल्या खोंडासारखा पळून गेला...

काय कुणाचं वाईट केलं होतं आम्ही? काय गुन्हा केला होता कुणाचा? कसं जगावं हे तर कळत नाहीच पण मरावं तरी कसं हे ही कळत नाही. कधीकधी असं वाटतं की प्रत्यक्ष व्यवहारात माणसं म्हणून वावरणारे आपणच  खरी भुतं आहोत आणि इकडं स्मशानात अतृप्तपणे उडत भटकणारी भुतं म्हणजे खरी माणसं आहेत. जीवन कसलं, भुताटकीच ही एक प्रकारची! (खिन्न, निराश. संगीताचा तुकडा सुरू आहे. डोळे पदरानं टिपत आहे. एकदम विजांचा लखलखाट, ढगांचा गडगडाट)

सौ : अरे बापरे ! कोणीतरी येतंय वाटतं–

श्री : तुझं हे भाषण ऐकून इथली भुतं जागी झालेली दिसतायत. चल तिकडं कोपऱ्यात बसून बघूया कोण येतंय ते! (तिला हाताला धरून उठवतो. दोघेही एका कोपऱ्यात जाऊन बसतात.)

झिपरी : ( एकीकडून हीऽऽ हीऽऽ हीऽऽ हीऽऽ करत झिपरी हडळ येते. लालभडक लुगडं, कपाळभर मळवट. हातभर चुडा. मोकळे सोडलेले लांबलचक केस, वाढलेली नखं, दाताचे सुळे बाहेर आलेले, हातात एक कवटी आणि एक मोठे हाड आहे. ते फिरवत हीऽऽऽ, हीऽऽऽ करत शोधक नजरेनं इकडं-तिकडं पाहत मधल्या समाधीजवळ जाऊन घुमायला लागते. श्री आणि सौ आडोशाला अंग चोरून बसलेले.)

झिपरी : (घुमत) माणसाचा वास येतुयाऽऽ, जित्त्या माणसाचा वास येतुयाऽऽ(पुन्हा घुमु लागते)

सौ : (हळूच ) अहो, 'जित्या माणसाचा वास येतुया' म्हणजे काय हो?

श्री : अगं तिला मेलेल्या मुडद्यांचा वास घेण्याची सवय. आपला जिवंत माणसांचा वास वेगळा येत असल्यामुळं त्रास होतोय तिला.

सौ : असं होय!

झिपरी : (घुमता घुमता कोपऱ्यातील श्री व सौ तिला दिसतात.) बरं सापडलाव, कोन तुमी? काय चाललंय तुमचं हितं? काय खुसुर-फुसुर करताय? बोला लवकर, नायतर शाप देऊन दगड करून टाकीन!

सौ : त... त... प... प... म... मी... ( श्रीकडे मदतीच्या अपेक्षेनं पाहाते) अहोऽऽऽ

श्री : (हात जोडत) आम्ही ढवळीकर, तिकडं गावात राहातो. सांधेदुखीवर वटवाघळाचं तेल देतो आम्ही औषध म्हणून!

पिंपरी : मग हिकडं कशापाय आलात? मुडद्यांची सांधेदुखी बरी करायला? (विकट हसते)

श्री : तसं नाही पण अगदी खरं सांगायचं तर...

पिंपरी : माज्यापाशी खोटं बोलायचं काम न्हाय! बोल!

श्री : आम्ही इथं जीव द्यायला आलोय.

झिपरी : जीव देयाला? आन् ते पर इथं? आन ते पर आजच? आज पूजेचा दिस हाय हितं माझा.

सौ : आम्हाला माहीत नव्हतं इथं कुणी पूजाविजा करीत असेल ते! अगदी देवाची शपथ!

झिपरी : आगदी खरं म्हणता?

सौ : खरं म्हणजे अगदी खरं! तुझ्या पूजेत व्यत्यय आणून आमचा काय फायदा होणार आहे? उलट झाली तर मदतच करू आम्ही तुला! (श्री ना) काय हो?

श्री : बरोबर!

झिपरी : चांगली शिकली-सवरलेली माणसं दिसताय तुमी, कशापाय जीव देताय?

सौ : तुला काय सांगू बाई आमची कर्मकहाणी!

झिपरी : (चिडत) मला 'बाई' म्हणताय?

श्री : (सांभाळून घेत) अगं दिसत नाय का तुला तिचं वय? (झिपरीला) माफ करा हं. तसं तुमचं वय काही फार झालेलं दिसत नाही. फार फार तर सोळा असेल.

झिपरी : ( खूष होत) शाबास रे माझ्या पठ्ठया! कसं अगदी सोन्याच्या मोलाचं बोललास!

श्री : (सौ ला खाजगी सुरात) माणसं काय नि भुतं काय, बाईला तिचं वय थोडं कमी करून सांगितलेलं नेहमीच आवडतं!

झिपरी : काय पुटपुटतोयस रे रताळ्या?

श्री : बापरे ऐकलं वाटतं... माफी मागतो तिची नाहीतर रताळ्यासारखी भाजून खायची. ( झिपरीला ) दुसरं काही नाही, वयाबद्दल बोलत होतो तुमच्या. हिला म्हटलं मी, की अगदी जरी सोळा नसलं तरी वीसच्या पुढं नक्कीच नाही!

झिपरी : आत्ता कसं? (स्वतःशी हिशेब करत ) म्हजी बघा, म्या मेली तवा व्हती वीस वर्सांची. आता हडळ व्हवून पाच वर्सं झाली. (बोटं मोजत) म्हजी बघा...

श्री : पंचवीस!

झिपरी : हां बरोबर. पर या पाच वर्षात एकसुदिक माणूस जीव देया आला न्हाय ह्या झिपरीच्या हद्दीत.

श्री : कुणाच्या हद्दीत?

झिपरी : झिपरीच्या!

सौ : आता ही झिपरी कोण?

झिपरी : आन् मीच नव्ह का?

श्री  : अच्छा, अच्छा! म्हणजे झिपरी नाव आहे तुझं.

झिपरी : आन मंग नय तं काय? (हे वाक्य तिचं आवडतं. जणू पालुपद. अधून-मधून एका विशिष्ट ढंगात ते ती म्हणत राहते.)

सौ : पण झिपरी हे नाव कसं काय पडलं तुला?

झिपरी : न्हानपनी व्वा पडल्यात्या माज्या डोईत...

सौ : काय झालं होतं?

झिपरी : व्वा पडल्यात्या डोईत!

सौ : काय पडल्या होत्या?

झिपरी : व्वॉ!

सौ : म्हणजे काय?

श्री : अगं व्वा म्हणजे उवा! उवा पडल्या होत्या तिच्या डोक्यात लहानपणी.

झिपरी : तवापास्नं केसाला फनी लावली नाय म्या. झिपऱ्या ह्या अशा कायम पसरलेल्या असत्यात. आन म्हणून झिपरी हे नाव पडलं माझं.

सौ : असं होय?

झिपरी : आन मंग नायतं काय? ( सौ.ना) आन काय गं ए टामन टिकले, बाईमाणसं अशी समशानात येत्यात का कवा?

सौ : हे स्मशान तुझ्या मालकीचं आहे याची कल्पना आधी असती तर आधी रितसर ॲप्लिकेशन करून, तुझी परवानगी घेऊन नंतरच आले असते!

झिपरी : आरं व्वा! तोंडाचा पट्टा चांगला चालवता येतो तुला. (श्री ना) कसा काय सौंसार केलास रं बाबा हिच्यासंगट?

श्री : ( खूष होत) अगदी बरोबर ओळखलंत तुम्ही. जगणं कठीण करून टाकलं हिनं म्हणूनच जीव द्यायला आलो इथं... तर इथंही पाठोपाठ हजर!

झिपरी : काय ग फुकणे, खरं हाय का हा म्हणतोय ते?

सौ : काय खरं आहे? लग्न केलं, मुलं झाली, मग पुढची जबाबदारी घ्यायला नको?

झिपरी : (श्री ना ) हे मातर खरं हाय आगदी हिचं. सौंसारात सांबाळून घ्यावं लागतं एककमेकाला.

श्री : पण त्याला काही मर्यादा?

झिपरी : (सौ.कडे पाहात) टाळी कवा एका हातानं वाजत न्हाय.

सौ : मला काही हौस नव्हती पण पोराला काढलं घराबाहेर आणि हे लागले शेजारणीच्या मागं म्हणून पाठ धरली मी त्यांची!

झिपरी : शेजारणीच्या मागं लागला? हा 'पाप्याचा पीतर' आशी काय भानगड करीलसं वाटत न्हाय.

सौ : तुला नाहीपटायचं. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.

झिपरी : (श्री.ना) काय रे?

श्री : मी नाही काढलं मुलाला बाहेर. हिच्या कटकटींना कंटाळून निघून गेला तो.

झिपरी : आन् ती शेजारणीची भानगड?

श्री : काही भानगड नाही. आमचे शेजारी म्हणजे देवमाणसं आहेत अगदी. उगाच आपला काहीतरी संशय घेत राहाते ही, झालं!

झिपरी : (सौला) म्या सांगती तुला, नीट ऐक! संशयाचं भूत एकदा का मानगुटीवर बसलं माणसाच्या की उतरत न्हाय मग मरूस्तवर!

सौ : तू हडळ असून तुला कसं काय माहीत हे?

झिपरी : म्या हडळ झाली ती नंतर... आधी तुमच्यासारखी माणूसच व्हती म्या. चांगली शेतीवाडी व्हती. घरदार व्हतं. आय बाप व्हतं... 'एशेशी’ पतूर शिक्षण झालं व्हतं...

सौ : 'एशेशी 'पतूर?

झिपरी : 'एशेशी’ म्हायत न्हाय? एशेशी!

श्री :  अगं 'एसेस्सी' असं म्हणायचंय तिला!

झिपरी : आन मंग नाय तं काय?

श्री : बरं मग पुढं काय झालं?

झिपरी : नजर लागली कोण्या हडळीची.

सौ :  स्वतः हडळ असून दुसरीला हडळ म्हणतीय बघ. मी हसते लोकाला अन् शेंबूड माझ्या नाकाला...

झिपरी : काय पुटपुटतीस ग टिटवे?

सौ : काही नाही. एवढी चांगली शिकलेली मुलगी तू, पण हडळ कशी झालीस याचं आश्चर्य वाटतंय आम्हाला.

झिपरी : मग मला इचारा की! एवढी चांगली जंटलमन माणसं आसून बी कळत न्हाय व्हय तुमाला?

श्री : कशी काय झालीस हडळ... सांग बरं?

झिपरी : (थांबून) माझं पिरेम व्हतं एका माणसावर...

श्री : भुताचं प्रेम माणसावर?

झिपरी : तवा भूत झाली नव्हती म्या, सांगिटलं नव्हं?

श्री : अरे हो. सॉरी.

सौ : मग काय झालं पुढं?

झिपरी : दुसरीच एक बया आली मधल्यामधी आन् घेऊन गेली त्याला.

सौ :  'घेऊन गेली'? म्हणजे?

झिपरी : करणी केली हडळीनं आन भुलवून लगीन लावलं त्याच्याशी. डोस्क्याचा इस्कोट झाला माज्या...

सौ : मग काय केलंस तू?

झिपरी : दुसरं काय करणार? आता तुमचा जो इच्यार चाललाय, तेच केलं म्या... जीव दिला.

श्री : अरे वा ! कसा जीव दिलास ते सांग बरं. आम्ही तर त्याचीच वाट बघतोय.

झिपरी :  (आवेशात ) गावात जत्रा व्हती...

श्री : बरं.

झिपरी : जत्रंत आकाश पाळणा व्हता.

श्री : बरं.

झिपरी : म्या आकाश पाळण्यात बसली.

श्री : ओके.

झिपरी : पाळणा वर गेला.

सौ : बरं...

झिपरी : मग लुगड्याचा पदर असा मानेवर गुंडाळून घेतला, पाळण्याच्या चक्राच्या मधल्या दांड्याला बांधला आन वरनं जशी का उडी मारली...

श्री : तसा पाळणा तुटला!

झिपरी : पाळणा कसला तुटतोय रे बुळकुंड्या? फासाला लटकल्यागत लांबकळायला लागली मी... हीऽऽऽ भाईर आली जीभ...

सौ : (श्रींना) वा, ही मस्त आयडिया आहे, आपल्याला मरण्यासाठी!

श्री : जाऊ या मग दोघंही “तालुक्याच्या गावाला "

सौ : पण तुम्हाला गळ्याभोवती गुंडाळायला लुगड्याचा पदर कुठाय?

श्री : लुगडं नेसतो की, नाहीतरी मरायचंच आहे!

सौ : त्यापेक्षा जत्रेतनं एक चांगली. मफलर विकत घेऊ आपण. मजबूत असली म्हणजे झालं...

झिपरी : कश्यापाय मरायचा इच्यार चाललाय तुमचा?

श्री : सुटू एकदाचे या संसाराच्या कटकटीतनं!

झिपरी : चांगलं मरान आलं तरच सुटतोय माणूस. नायतं लोंबकळत ऱ्हातुया माझ्यागत मधल्यामधी!

श्री : म्हणजे?

झिपरी : ही ही ही हीऽऽऽ

श्री : काय झालं हसायला?

झिपरी : मला मुक्ती मिळालेली न्हाय अजून. नाय तर हडळ कशाला झाली असती म्या?

श्री : असं होय?

झिपरी : काय सांगू तुमास्नी... जीव दिला त्यो पन पाटात पोर असताना...

सौ : पोटात पोर असताना जीव दिलास तू?

झिपरी : आन मंग नाय तं काय? म्हणून स्वर्गातपण घेईनात नी नर्कातपण घेईनात मस्नी. शिक्षा दिली देवानं, झाली म्या हडळ...

सौ : पण पोटात पोर आहे हे तुझ्या त्या प्रियकराला समजलं नाही?

झिपरी : पोर हाय त्ये समजलं...

सौ : मग!

झिपरी : पण त्ये त्याचं न्हाय आसं भरवलं त्या सटवीनं त्याच्या मनात... सौशयानं आंधळा झाला त्यो... आन मंग दुसरं काय करनार व्हते म्या? दिला जीव!

श्री : अरेरे, तुझी काहीच चूक नसताना शिक्षा करून घेतलीस तू स्वतःला.

झिपरी : जीव गेला तो गेला आन वर हाडळीचा जन्म मिळाला... म्हणून सांगती बाबानो, जीव देऊ नका, नायतर माझ्यासारखी 'प्रस्थिती' व्हायची तुमची.

सौ : प्रस्थिती? ( गोंधळून श्री कडे पाहाते.)

झिपरी : एवढी चांगली शिकली सवरलेली माणसं असून 'प्रस्थिती'...कळत न्हाय व्हय तुमाला? प्रस्थिती!

श्री : ( सौ ला ) अगं परिस्थिती म्हणायचंय तिला... (हडळीला) बरोबर ना?

झिपरी : आन मंग नाय तं काय?

सौ : पण यातून सुटकेचा काही मार्ग नाही का तुला?

झिपरी : आजच्या दिसाला पाच वर्सं झाली–

श्री : कशाला?

झिपरी : आज अघोर अमोश्या न्हाय का?

सौ : अघोर अमावास्या? ही काय भानगड आहे?

श्री : नारळी पोर्णिमा, पिठोरी अमावास्या ऐकलं होतं, पण अधार अमावास्या ऐकलं नव्हतं कधी.

सौ : पाहिलं पाहिजे साळगावकरांच्या पंचांगात!

झिपरी : भुतांचं पंचांग येगळं आस्तंय आमचं. वर्सातनं एकदाच येती आमची अघोर अमोश्या!

श्री : काय करता मग या अघोर अमावास्येला तुम्ही?

झिपरी : इथं एक बाबा यंतुया दर वसाला, आजच्या दिवशी...

सौ : काय नाव म्हणालीस?

झिपरी : भरम्या बाबा!

सौ : भस्म्या बाबा?

झिपरी : भस्म्म्या बाबा म्हायत नाय? अरारारारा... शंभर गावच्या पंचक्रोशीतली भुतं वळाखतात त्याला.

श्री : भुतं ओळखत असतील पण आम्ही कसं काय ओळखणार त्याला?

सौ : आम्ही मेलोय कुठं अजून? वाटल्यास ॲड्रेस देऊन ठेव, मेल्यावर जातो भेटायला!

झिपरी : चष्टा करू नगं बरं का फोकाट्या! बाबा संतापला तर समोरच्या माणसाचं भस्म करून टाकतोय ताबडतोब!

श्री : बापरे, म्हणून भस्म्याबाबा हे नाव पडलंय वाटत त्याला. इथं येऊन काय करतो तो?

झिपरी : त्याची पूजा करती म्या नेमानं आजची पाचव्या वर्साची पूजा झाली आन् माझ्या व्रत्ताचं उध्यापन झालं... का मुक्ती मिळणार हाय मला!

श्री : व्रताचं उध्यापन?

सौ : अहो, उद्यापन असं म्हणायचंय तिला!

झिपरी : (खुशीनं) आन मंग नाय तं काय?

श्री : म्हणजे भुता-खेतांचीसुद्धा व्रतंवैकल्ये असतात ? विचारलं पाहिजे एकदा रामसे बंधूंना !

झिपरी : इक्त सोपं अस्तया का त्ये ! पाच वर्स सेवा केली तवा सांगिटला त्यानं माज्या गुक्तीचा मार्ग...

श्री : वा वा... नशीब चांगलं म्हणायचं तुझं! नाहीतर अशीच कायम लांबकळत राहिली असतीस.

झिपरी : खरं बोललासा... पण बाबानं 'अट्ट' घातली व्हती...

सौ : अट्ट?

झिपरी : 'अट्ट म्हायत नाय तुला? ( जणू समजावून सांगत) आऽट्ट!

श्री : ( समजावत) अट गं... (झिपरीला) बरोबर ना?

झिपरी : आन मंग नाय तं काय?

सौ : कोणती अट?

झिपरी : एखाद्या भांडखोर बाईचं 'शिकमळ' घेयाचं.

श्री : काय घ्यायचं?

झिपरी : शिर्कमळ...

सौ : शिर्कमळ?

झिपरी : तुमी एवढी शिकली सवरलेली माणसं आसून शिर्कमळ म्हायत न्हाय तुम्हाला? शिर्कमळ म्हजी डोस्कं! (दोघानाही कळलेले नाही म्हणून ती आणखी स्पष्ट करून सांगते) मुंडी, मुंडी! आलं का टकुऱ्यात?

श्री : आलं, आलं... पण शिरकमळ घेऊन करायचं काय?

झिपरी : भस्म्या बाबाच्या चरण कमळावर अर्पन करायचं.

श्री : शिरकमळ चरण कमळावर अर्पण करायचं या कल्पनेनंच माझी नेत्रकमळं पांढरी व्हायची वेळ आली .

झिपरी : चष्टा करतुयास काय रे फुटाण्या?

श्री : तुझी चेष्टा कशाला करू, उलट तुझ्यासारखाच

मी सुद्धा एशेशी का झालो नाही याचा पश्चाताप होतोय आता...

सौ : (झिपरीला) थोडक्यात म्हणजे तू भरम्याबाबाला भांडखोर बाईचं शिरकमळ वाहणार... बरोबर ना?

झिपरी : आनं मंग नाय तं काय?

सौ : मग तू मुक्त होणार...

झिपरी : आनं मंग नाय तं काय?

सौ : पण भांडखोर बाईचं शिरकमळ कुठं मिळणाराय तुला?

झिपरी : (कमरेचा कोयता काढून सोया दिशेनं पुढं जात) हे काय ? (ही  ही  ही ही  करत तिच्या मागं लागते. सौ आणि झिपरी गोल गोल फिरू लागतात.) हीऽ  हीऽ  हीऽ  हीऽ  (वर पाहत) देवालय उपकार झाले तुझे. अघोर अमोश्या आन भांडखोर बाईची मुंडी असा योग एकदमच जुळवून आणलास बाबा आज... आता मुक्ती मिळणार मला. (सौ.ला) आगं होऽऽ होऽऽ थांब की  कुठं पळतीस टिटवीसारखी " अशी नाय थांबणार तू. मंतर मारून जागीच अडकवून ठेवती तुला. थांब! (अंगाला झटके देत मंत्र म्हणू लागते )

झिपरी : ॐ ॐ स्टिक... स्टिक... स्टाप... स्टाप

ॐ  हूऽऽम... डक... डक... डक... ॐ ऱ्हीऽऽऽ म्... चट्... चट्... ॐ क्लिऽऽम् भिन्न... भिन्... भिन्...

ॐ  ऱ्हाऽम... ॐ  स्टाऽप...

ॐ  हृ ऽम... ॐ  चट् ऽऽ

ऱ्हाम... स्टाप... चट्... डक !

ॐ  ॐ  ॐ  ॐ...

( मंत्र म्हणत पळता पळता सौ ला समाधीच्या एका छोट्या चौथऱ्यावर ढकलत नेते. तेथे मंत्र म्हणत तिच्या भोवती कोयतीनं एक काल्पनिक वर्तुळ आखून घेते. सौला आता त्या मंतरलेल्या वर्तुळातून बाहेर पडता येत नाही. तिला तशी अडकवल्यावर झिपरी आनंदानं नाचायला लागते)

झिपरी : (श्री ना) तुला मदत करायची व्हती ना माज्या पूजेत ? मंग मिळाली मदत ... (हसते)

सौ : (त्या अदृश्य पिंजऱ्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत) अगंबाई, काय नशिबी आलं हे ? कुठनं दुर्बुद्धी झाली आणि या स्मशानात आले मी. अहो ऽऽऽ बघा की कशी आत अडकलेय मी ती... सोडवा की मला... नुसते बघत काय उभे राहिलात?

श्री : अगं पण काय करावं तेच कळत नाय मला, आणि मला एक सांग, तुला एवीतेवी मरायचंच होतं ना. मग आता कशाला काळजी करतेस? कोयती बघितलीस तिच्या हातातली? एका घावात 'शिर्कमळ' वेगळं करील ती तुझं 'धडकमळा'पासून!

सौ : माझा जीव जायची वेळ आलीय आणि तुम्हाला कोट्या सुचतायत... कुठनं दुर्बुद्धी झाली आणि इथं आले मी! (प्रेक्षकांकडं पाहात) काय करावं ह्या नशिबाला?

श्री : पश्चाताप करून काय होणार आहे आता? (झिपरीला भुत्सद्दीपणे) मला फक्त एवढंच सांगा झिपरी मॅडम...

झिपरी : म्याडम? वा किती ब्येस वाटलं ऐकून! पाच वर्स झाली हडळ होऊन पर 'म्याडम' आसं आजवर कांनी बोललं नव्हतं मला... बोला, काय इचारताय?

श्री : मला एक सांगा, ह्या कोयतीनं हिचं शीर धडावेगळं करून भस्म्या बाबाला अर्पण करणार तुम्ही, पण मला कसं ठार मारणार ते समजलं नाही अजून!

झिपरी : तुला गरिबाला कशाला मारू रे बाबा मी? तू तर अगदी देवमाणूस हायस. तुला सोडून देणार मी.

श्री : ( खूष होत सौला) बांघतलंस, एक हडळ असून माझ्यावर किती विश्वास आहे तिचा ते!

सौ : (हडळीला) तू यांच्या बोलण्यावर जाऊ नकोस. बाहेरून दिसतात तसे नाहीत ते.

झिपरी : आन मंग नाय तं काय?

सौ : शेजारी बाई राहाते आमच्या एक. तिच्याशी संधान जुळवण्याची खटपट सुरू आहे यांची... कितीदा सांगितलं नजर चांगली नाय तिची म्हणून, पण ऐकतच नाहीत हे... तुला जर एखाद्या ढोंगी पुरुषाचं शिरकमळ हवं असेल तर मागचा पुढचा काहीही विचार न करता याचं घेऊन टाक आधी!

श्री : (हडळीला) तुम्ही काही ऐकू नका तिचं, मानेवर भूत बसलंय तिच्या संशयाचं!

झिपरी : माज्या ध्यानात आलंय ते, म्हणूनच सोडून देतीय मी तुला! मी हिला ठार करती आता मंग नवऱ्यावर संशय घेणाऱ्या बाईचं काय होतं ते त समद्या जगाला सांगत फिर तू!

श्री : आय सी... असा प्लॅन आहे तर तुझा... डोकेबाज दिसतेस चांगली.

झिपरी : येडी वाटली का काय मी तुला?

श्री : ( घाईनं ) छे छे... चांगली 'एशेशी' पतुर शिकलेली आहेस याची कल्पना आहे मला.

(पखवाज वाजू लागतो)

झिपरी : अग ऽऽबाय... आला वाटतं बाबा!

श्री : बाबा?

झिपरी : बाबा येतया आमचा, पखवाज वाजाय लागला न्हाय का?

श्री : म्हणजे पखवाज वाजवत येतात का बाबा नेहमी?

झिपरी : त्यो कश्यापाय वाजवतोय? बाबा निघाला की पखवाज वाजाय लागतो आपोआप...

सौ : आपोआप?

झिपरी : शंकरभक्तीचा चमत्कार हाय त्यो.

सौ : बापरे! आपोआप वाजायला लागतो पखवाज म्हणजे पॉवरफूल असणार हा बाबा! वाचव रे देवा!

( एका बाजूने तालबद्ध आणि दणदणीत नृत्य करत भम्याबाबा प्रवेश करतो. कमरेला काळा पंचा गुंडाळलेला. डोक्याला काळा रुमाल. काळं उपरणं, काखेला झोळी. कपाळाला भस्म, रुद्राक्षांच्या माळा, एका हातात चिमटा... मराठी- संस्कृत - कानडी मिश्रित गाणं म्हणत आहे. झिप्रीही त्याला साथ देते.)

शिवतोम शिवतोम शिवतोम

शिवन पंचाक्षरी मंत्र विदाम...

ब्रह्मानंद द नाथ द वि नादिनळांगनां

कुळती विदांम काशिनाथ,

कबीरदास नामस्मरणीयांम

तेहतीस कोटी देवतागळग वाक्य विदाम

असल आडवती ब्राह्म विदोम

अरविंद सर्वर्य तिळस विदांम

शिवतोम शिवतांम शिवतोम

शिवन पंचाक्षरी मंत्र विदोम...

( गाणं संपता संपता भरम्या शेंदूर लावलेल्या दगडांच्या चौथऱ्याजवळ उभा. संगीत सुरूच आहे. झिपरी अंगात आल्याप्रमाणं घुमत त्याच्यासमोर जाते. कवटी त्याच्यासमोर ठेवते. हातातलं हाड तीनदा वर खाली करत त्याला लोटांगण घालते)

झिपरी : आज माझ्या मुक्तीचा दिवस. मला मोकळी कर बाबा...

भस्म्या : ( नेहमी पद्यात किंवा पद्य लयीत बोलतो. कधी कधी समेवर येण्यासाठी 'अलख!' या शब्दाचा वापर करतो.)

कौन लोग है ये? इधर क्या कर रहे है ये?

झिपरी : तुला भांडखोर बाईचं शिर्कमळ पायजे ना?

भस्म्या : इसमे कोईभी शक नही, नही तो तुम्हारी मुक्ती नही.

झिपरी : मग हीच ती भांडखोर बाई. आता उडवती तिचं मुंडकं आन वाहती तुझ्या चरणावर... (कोयती उंचावून थयथयाट करत नाचू लागते. संगीत.)

सौ : मी भांडखोर नाही बाबा, कुणाचीही शपथ घ्यायला सांगा... मी कशाला कुणाशी भांडू? (पुढील संपूर्ण परिच्छेद एका दमात भडाभडा बोलते) लग्नाला इतकी वर्ष झाली आमच्या पण आजवर मी कधी त्यांच्याशी भांडल्याचं आठवत नाही मला. ( श्रींना- ) सांगा की हो, इतकी वर्ष नेकीनं संसार केला, एक शब्द काढला कधी तोंडातनं? लग्नानंतर पहिल्या संक्रांतीला काळी साडी घेऊन दिली नाही, भांडले का? मुलाच्या बारशाला निमंत्रणपत्रिका छापली नाही, भांडले का? हळदी- कुंकवासाठी, भिशीसाठी बायका येतात म्हणून हॉलमध्ये नवा गालिचा घेऊन द्या म्हटलं, दिला नाही, भांडले का शूटींग बघायला एकदा तरी फिल्मसिटीत घेऊन जा म्हटलं, नेलं नाही, भांडले का? पहिल्या बाळंतपणाला आई घरी नेण्यासाठी आली, पाठवली नाही, भांडलं का? सांगा, बोला की, आता का मिठाची गुळणी धरून बसलात? बोला... सांगा... बोला की!

भस्म्या : अबाबाबा, पहुंची हुई औरत दिखती. इसको है मेरी पसंती...

सौ : काय 'पसंत' आहे मी?

झिपरी : वय थोडं जास्तीचं हाय पण 'चालंल' बाबाला. ( सौ नं चिडावं अशी हसते)

सौ : (संतापून झिपरीला) मी काय अशी तशी बाई वाटले काय तुला? काय गं ए चांडाळणी ऽऽऽ मला बिघडवायला निघालीस काय? तळतळाट होईल तुझा.

भस्म्या : अरे, अरे, अरे ! क्यू इतना हंगामा करती?

तुम नही, तुम्हारा शिरकमल, ये है मेरी पसंती.

सौ : मगर इसके कहने का टोनिंग अलग था बाबा... हिच्या असल्या वागणुकीमुळंच हडळ झाली ही पण अजून अक्कल येत नाही तिला.

भस्म्या : (झिपरीला) ऐसी झगडालू औरत कही नहीं मिलेगी, जल्दी से उड़ा दो उसका सर नहीं तो भाग निकलेगी!

झिपरी : आत्ता उडवते आणि अर्पन करते तुझ्या चरणांवर... (सौ च्या दिशेनं कोयती घेऊन निघते. जाताना ही ऽऽऽहीऽऽऽ करत नाचत आहे. प्रकाश बदलतो. गूढ संगीत.)

श्री : (हात जोडत) बाबा आम्हाला माफ करा. आमची चूक झाली.

भस्म्या : हम आपको कुछ नही करेंगे. तुम्हे तो हम जिन्दा छोड दंगे... अल्लख!

श्री : मुझे अकेले को मत छोडना बाबा, हम दोनों को साथ में मरना है. जिएंगे तो साथ, मरेंगे तो साथ...

भस्म्या : (सौ. ला) देखा, तुमपर कितना प्यार है, आपके साथ ही मरना चाहते हे.

सौ : उनका कुछ भरोसा नही है बाबा!

भस्म्या : पतीपर पत्नीका भरोसा हमेशा होना चाहिए.

कारोबार के दोनो पहिए साथ साथ चलने चाहिए.

श्री : बरोबर...

भस्म्या : विश्वास के उपर ही घरबार चलता है. ब्रम्हांड का चक्र चलता रहता है.

श्री : बरोबर...

भस्म्या : पती पर कभी शक नहीं लेना चाहिए. उसकी बुराईया बार बार नहीं दिखानी चाहिए.

श्री : अगदी बरोबर! पण हिला पटतच नाही. उठसूठ संशय घेत बसते...

भस्म्या : मैने आजतक बहोत भूतो को किया है सिधा

मगर शक के भूत की होती है अलग ही बाधा.

अगर एक बार वो घुस गया दिमाग में– तो पुरी बरबादी के बाद ही हम आते है होश मे... अल्लख!

श्री : ( हात जोडत) खरोखर धन्य आहात बाबा आपण, आपण सन्यासी असूनही प्रपंचातल्या या गोष्टी आपल्याला कशी काय माहीत?

भस्म्या : ऐसे मत समझो बेटा, सन्यासी तो सबसे छोटा. संसारसे भागता रहता है, घर गृहस्थी से डरता रहता है. साधा सा आदमी होता है बडा जो पुरे विश्वका चलाता है गाडा. समझने वालों को इशारा काफी है, इसका ही नाम जिन्दगी है!

सौ : (हात जोडत) में समझ गयी, मुझे छोड दो बाबा. दया करो...

भस्म्या : अभी तुम्हारा सर उडाने के बाद तुम हमेशा के लिये मुक्त हो जाओगी, सारे दुख दर्द और चिंता हमेशा के लिए भूल जाओगी.

सौ : ऐसा मत करना बाबा, हमें छोड़ दो बाबा. में इन के उपर कभी शक नही लुंगी.

भस्म्या : मगर जब है तुमको मरना तो इतना क्यूं घबराना?

सौ : मला एक संधी दे बाबा...

भस्म्या : तो फिर ठीक है. (झिपरीला) तूम रूकी वही पे (सौ ला) तुम निकलो वंहीसे... जल्दीसे... अल्लख!

सौ : मगर मे बाहर कैसे आऊ? इसने तो जादूटोणा करके मुझे यंहा बंदी बना के रखा है.

भस्म्या : मदद करो अपने आप की, कोशीश तो करो बाहर आने की... (भस्म्या पुढील मंत्र म्हणतो आणि ती सहजगत्या बाहेर येते. तिला स्वतःचंच आश्चर्य वाटतं.)

ॐ ॐ खिडल... खिल... खुल ऽऽऽ

ॐ 555 सूट... सूट... शूद 555

ॐ ऽऽऽ फ्रीडम्फ्रीडम 555 पट् 55s

ॐ 55 छन्... च्चल... चल 555

भस्म्या : ॐ SS खिल्ल्ऽ ॐ 55 सूटूड ॐ SS फ्रीम्ऽ

ॐ ऽऽ च्चल् ऽ खिल्... सृट्... फ्रीम्... च्चल्...

सौ : चमत्कार बाबा, चमत्कार!

भस्म्या : उसमे कोई चमत्कार नही, मंत्र तंत्र नही. सब मन का खेल है ये. समझने की बात है ये.

(झिपरीकडे बोट दाखवत)

इसने तुम्हारे कमजोरी का फायदा लिया

और तुमने खुद को बंदी बनाया....

मगर तुमने जब यंहासे बाहर निकलने का निश्चय किया

तब तुम्हारा बंधन अपने आप खुल गया.

सब मन का खेल है ये,

सब मन की कर्तूत है ये. अल्लख !

सौ : (पाया पडत) बाबा आज डोळे उघडले आमचे. पण आमची एक अडचण आहे.

भस्म्या :(जणू अंतर्ज्ञानाने) बच्चा घर से भाग गया है...

सौ : अगदी बरोबर बाबा, (हात जोडत) त्याला सुखरुप आमच्यापर्यंत...

भस्म्या : उसका वापस आना असंभव है.

सौ : असं बोलू नका बाबा!

भस्म्या : होनी कभी टलती नही... बूंद से गयी वो हौद से आती नाही...

श्री : काहीतरी मार्ग असेल बाबा.

भस्म्या : कुछ भी नहीं हो सकता, बच्चे को काई नही वापस ला सकता.

श्री : मग आम्ही काय करावं?

भस्म्या : वो तुम सोचलो, अपनी समस्याओं का हल आपही ढूंड लो.

मैने तुमको छोडा है... आगे होगा जो होना है...

(झिपरीला ) मेरा प्रशाद दे दो. भूख लगी है. अल्लख!

झिपरी : आत्ता देते बाबा... ( उडी मारून समाधीच्या मागे जाते. तेथून स्टिलचा डबा काढते. उघडून पाहाते तर रिकामा) आगं बया ऽऽऽ डबा तर रिकामा दिसतुया. (रिकामा डबा एकावर एक वाजवत) आरं माझ्या नशिबा, आता मी बाबाला परसाद कसला दावू? कोन्या दुष्मनानं दावा साधला!

भस्म्या : मेरा प्रशाद... अलख!

झिपरी : (छाती पिटून घेत) आता म्या काय करू? बाबाला कसला परसाद दावू... आज पाचव्या वर्साची पूजा व्हती बाबाची... आता बाबाचा कोप व्हईल... बाबा, माफ कर मला... ( सौ कडे संशयानं पाहत) काय ग ए बोंडुकले, तू तर नाय काढलास डबा भाईर?

सौ : म.. म... म... प.. प...

भस्म्या : ये अपमान में कभी नही सह पाऊंगा, क्रोधित हो के मैं चला जा रहा...

(पखवाज वाजू लागतो. बाबा ताल धरून नाचू लागतो)

झिपरी : बाबा, मला माफी कर, मस्नी पदरात घे...

भस्म्या : हटो मेरे रास्तेसे... नही तो भस्म कर दूंगा झटके से ...

झिपरी : पर माझ्या मुक्तीचं काय?

भस्म्या : मैं चला... अल्लख ने बुला लिया... अलख!

झिपरी : माझ्या मुक्तीचं काय बाबा? आज पाचव्या वर्साची पूजा केली म्या तुझी...

भस्म्या : अब अगली अघोर अमोस्या...

तब तक करती रहो तपस्या...

झिपरी : म्हजी बाबा मला अजून वर्षभर इथंच खितपत पडायला सांगतो का काय?

भस्म्या : जी बिलकुल... जान देने की, यही सजा है,

आत्महत्त्या प्रकृती के खिलाफ है...

(त्या दोघांना)

और तुम दोनों–

(ते दोघे हात जोडत पुढे येतात.)

तुमने बाबा का परशाद उसको बिना पूछे खा लिया इसलिए तुमको भी मै सजा दे रहा...

इधर आवो और खडे रहो ऐसे,

तुम दोनो के पुतले बन गये अभी से!

(जोरात ‘अल्लख!’ असे म्हणताच ते दोघेही 'स्टॅच्यू' झाल्याप्रमाणे उभे होतात) यंहासे अब मुष्कील तुम्हारा छुटना. अब तुम्हारे नसीब में लिखा है सिर्फ तडप तडप के मर जाना. अल्लख! अल्लख!!

( प्रकाश बदलतो "शिवतांम शिवतोम" करत, नाचत नाचत भस्म्या निघू लागतो. हडळ "मला माफ कर बाबा, मला पदरात घे, मला मुक्ती दे", अशी गयावया करत घुमत घुमत त्याच्या मागोमाग निघून जाते. श्री आणि सौ. 'त्या' जागी पुतळ्यासारखे उभे राहून असहायपणे भस्म्याकडे पाहात आहेत. हळूहळू पडदा)

**मध्यंतर**

***

(सूचना : या नाटकाची पूर्ण संहिता प्राप्त करून घ्यावयाची असल्यास वेबसाईटमध्ये दिलेल्या पत्त्यावर लेखकाशी संपर्क करावा.  नाटकाचे सर्व हक्क राखीव आहेत. प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नाटकाचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, वेब-सिरीज, त्याचे अभिवाचन, यूट्युब/ फेसबुकवरील किंवा कोणत्याही प्रकारच्या माध्यमातून पूर्ण किंवा अंशत:  असा कोणत्याही प्रकारचा आविष्कार करण्यापूर्वी, तसेच त्याचे चित्रिकरण, ध्वनिमुद्रण इत्यादीपूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.)

***